लोकमत

## 'अपेडा'चे दुसऱ्यांदा सल्लागार : गुडेवाडी येथील डॉ. परशराम पाटील यांची प्रेरणादायी वाटचाल

# चंदगड तालुक्यातील शेतकरी पोराचा दिल्लीत डंका

नसिम सनदी ।
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : दिल्लीस्थित भारतीय कृषी व प्रक्रियायुक्त अन्ननिर्यात विकास प्राधिकरण (अपेडा)सारख्या शेतीसंदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणाऱ्या संस्थेवर सलग दुसऱ्यांदा सल्लागार म्हणून काम करण्याची संधी कोल्हापूरला मिळाली आहे. शेतकऱ्याच्याच मुलाने शेतकऱ्यांसाठीच्या संस्थेवर सल्लागार म्हणून जाण्याची ही किमया साधली आहे, चंदगड तालुक्यातील गुडेवाडी येथील डॉ. परशराम पाटील यांनी. त्यांच्या या फेरनिवडीने जिल्ह्यातील काजूसारख्या प्रक्रिया उद्योगांना अधिक गती येण्यास अवकाश मोकळे झाले आहे. आता गरज आहे ती फक्त त्याचा लाभ उठविण्याची.



परशराम पाटील

### झेप अशीही...

मुलाच्या शिक्षणासाठी वडिलांनी शेत विकले, आई दुसऱ्याच्या शेतावर मजुरी करु लागली. मोठ्या कष्टाने शिक्षण घेऊन पोराने आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केले. आज पाटील यांच्या यशाचे कौतुक गावालाच नव्हे, तर देशालाही आहे. आज त्यांच्यामुळे प्रक्रिया उद्योगांसाठी केंद्र सरकारला स्वतंत्र धोरण हाती घ्यावे लागले आहे. शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या पंतप्रधान मोदी यांच्या योजनेवर चंदगडचे परशराम पाटील काम करीत आहेत हे विशेष...!!

'अपेडा' ही संस्था देशांतर्गत उत्पादनांना बाहेरील देशातील पाठविण्यासाठीची संपूर्ण व्यवस्था निर्माण करून देणारी सरकारी संस्था आहे. वाणिज्य आणि अन्न मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या संस्थेसाठी देशभरातून सहा लोकांची सल्लागार समिती नियुक्त केली जाते. या सहामध्ये परशराम पाटील यांना संधी मिळाली आहे. गेल्या दीड वर्षापासून ते दिल्लीत या पदावर काम करीत आहेत. त्यांचा प्रक्रिया उद्योगातील अभ्यास पाहून त्यांची पुन्हा एक वर्षासाठी याच पदावर फेरनिवड झाली. या संस्थेपर्यंत पोहोचण्याची पाटील यांची मोठी रंजक कहाणी आहे. परशराम पाटील यांचे प्राथमिक शिक्षण गावात, तर पदवीचे तालुक्यात झाले. एम.कॉम.च्या शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात आलो आणि प्रगतीच्या नव्या वाटा दिसू लागल्या, असे पाटील सांगतात.

'काजू उद्योगातील समस्या' हा विषय घेऊन त्यांनी पीएच.डी. केली आणि या निमित्ताने झालेल्या अभ्यासातून आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंत शोधनिबंधाच्या माध्यमातून काजू पोहोचला. यातील अभ्यास पाहून भारत सरकारने पोस्ट डॉक्टरेटसाठी फेलोशिप दिली. पुणे विद्यापीठात तीन वर्षे यावर सखोल अभ्यास केल्यानंतर राधाकृष्णन यांच्या नावाने दिलेल्या या फेलोशिपमध्ये त्यांनी देशात प्रथम क्रमांक पटकाविला. या फेलोशिपने दिल्लीचे दरवाजे उघडले गेले. पाटील यांना वाणिज्य मंत्रालयात बोलावून घेण्यात आले. प्रक्रिया उद्योग आणि निर्यात धोरणाविषयी सल्ले देणाऱ्या टीममध्येच त्यांचा समावेश केला गेला. नोकरीधंद्यासाठी डोंगरवाड्या-वस्त्यांतून तरुणांनी शहराकडे धाव घेण्याऐवजी गावातच चांगल्या प्रकारे शेती विकसित करून प्रक्रिया उद्योग उभारुन अनेकांना रोजगार उपलब्ध करुन देता येऊ शकतो, अशी संकल्पना ते मांडतात. कोल्हापूरच्या मातीत सोने आहे, फक्त ते पिकविण्याची आणि विकण्याची कला जोपासली तर खऱ्या अर्थाने कोल्हापूर जगात भारी होईल, असे पाटील आवर्जून सांगतात.

# विद्यापीठातील वसतिगृहे केली रिकामी

## कोरोनाग्रस्तांसाठी होणार रुग्णालय

**कोल्हापूर, ता. २३ :** शिवाजी विद्यापीठातील तीन वसतिगृहांमध्ये कोरोना रुग्णांसाठी रुग्णालय उभारले जाणार आहे. यासाठी आज तेथील विद्यार्थ्यांच्या साहित्याचे स्थलांतर करण्यात आले. आज पहिल्या दिवशी एका वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे साहित्य स्थलांतरित करण्यात आले. या वेळी प्रत्येक खोलीतील व्हिडिओ शूटिंग घेण्यात आले आहे. लवकरच येथे कोरोना रुग्णांसाठी रुग्णालय उभारण्यात येणार असून, यात अतिदक्षता विभागही असणार आहे.

जिल्ह्यात कोरोना रुग्णांची संख्या वाढल्यास त्यांच्यावर उपचार करण्यासाठी शिवाजी विद्यापीठात एक हजार बेडचे रुग्णालय होणार आहे. यासाठी तंत्रशिक्षण विभागाचे एक वसतिगृह आणि मुख्य इमारतीच्या आवारातील तीन वसतिगृहे प्रशासनाने ताब्यात घेतली. यातील तंत्रशिक्षण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थिनींचे साहित्य स्थलांतरित करण्यात आले. आज मुख्य इमारतीजवळील वसतिगृहातील साहित्य स्थलांतरित केले गेले. या वेळी प्रत्येक खोलीचे व्हिडिओ शूटिंगही घेण्यात आले. एकूण ३१५ खोल्यांमध्ये ६५० बेडचे रुग्णालय उभारण्यात येईल.

### अतिदक्षता विभागासाठी निधी

जिल्हा नियोजन समितीकडून शिवाजी विद्यापीठातील तंत्रशिक्षण विभागातील अलगीकरण कक्षात अतिदक्षता विभाग सुरू करण्यासाठी २९.४२ लाख निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीचा विनियोग पुढीलप्रमाणे होईल.

- स्थापत्य कामे- ८.८२ लाख
- विद्युत कामे- १०.०७ लाख
- ऑक्सिजन पुरवठ्याची कामे- ०६.१५ लाख
- वातानुकूलित यंत्रणा बसविणे- ४.३८ लाख
- एकूण - २९.४२

# तब्बल साडेपाचशे व्हिडिओ लेक्चर्स

## सहायक प्राध्यापकांच्या 'वर्क फ्रॉम होम'मधून किमया; विद्यार्थ्यांचाही प्रतिसाद

**संदीप खांडेकर** : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. २२ : एक नव्हे, दोन नव्हे तर विविध विषयांच्या अभ्यासक्रमावर आधारित तब्बल साडेपाचशे व्हिडिओ लेक्चर्स शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राने बनविले आहेत. अवघ्या ३७ दिवसांत केंद्राकडील सहायक प्राध्यापकांच्या 'वर्क फ्रॉम होम'मधून ही किमया घडली आहे. विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in/distedu/ संकेतस्थळावर Self Learning Material मधून व्हिडिओ उपलब्ध केले असून, विद्यार्थी त्याचा लाभ घेताना दिसत आहेत.**





शिक्षणापासून वंचित असणाऱ्या विविध सामाजिक घटकांना शिक्षण घेण्याची संधी दूरशिक्षण केंद्र उपलब्ध करुन देते. कोरोनाचा प्रादुर्भाव देशभरात वाढू लागल्यानंतर दूरशिक्षण केंद्राने तत्परतेने पावले टाकण्यास सुरुवात केली. संचारबंदीच्या काळात विद्यार्थ्यांना ऑनलाईन व्हिडिओ लेक्चर्स पाहता यावीत, यासाठी प्रयत्न सुरू झाले. उपकुलसचिव डॉ. एन. जे. बनसोडे यांनी सहायक प्राध्यापकांना व्हिडिओ लेक्चर तयार करण्याबाबत प्रोत्साहित केले.

दूरशिक्षण केंद्रातर्फे बीए, बी.कॉम, एम.ए. एम कॉम, एम. बी. ए, व्हॅल्युएशन ऑफ रिअल इस्टेट व पीजी डिप्लोमा इन ट्रान्सलेशन स्टडीज आदी अभ्यासक्रम शिकवले जातात. ज्यांचे शिक्षण अर्धवट राहिले किंवा जे नोकरी करून शिकण्यासाठी तयार आहेत, त्यांच्यासाठी केंद्र आधारवड आहे. केंद्राकडे आजघडीला सुमारे २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

विद्यार्थीकेंद्रित भूमिकेतून विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मार्गदर्शन केले जाते. दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहाय्यक प्राध्यापक व सर्व प्रशासकीय सेवक तत्परतेने काम करत आहेत.

> **विद्यार्थी ज्ञानार्जनापासून वंचित राहू नये, यासाठी दूरशिक्षण केंद्रातील सहायक प्राध्यापक व प्रशासकीय सेवक आयसीटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन व्हावे, म्हणून सातत्याने कार्यशील आहेत. अपलोड केलेल्या व्हिडिओ लेक्चर्सना आतापर्यंत दहा हजार व्हियुज मिळाले आहेत. विद्यार्थ्यांना काही शंका असल्यास ते मार्गदर्शनासाठी सहायक प्राध्यापकांशी संपर्क करू शकतात. त्यांचे मोबाईल नंबर संकेतस्थळावर उपलब्ध केले आहेत.**
>
> **- डॉ. एन. जे**
>
> उपकुलसचिव, दूरशिक्षण केंद्र शिवा

लोकमत

शिवाजी विद्यापीठ वसतिगृह : प्रक्रिया पूर्ण होण्यास तीन दिवस लागणार

# साहित्याचे स्थलांतरण सुरु

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जिल्हा प्रशासनाच्या वतीने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दक्षता म्हणून शिवाजी विद्यापीठातील मुलांच्या तिन्ही वसतिगृहांमध्ये ५०० बेडचे आयसोलेशन रुग्णालय तयार केले जाणार आहे. त्यासाठी वसतिगृहांमध्ये असलेल्या साहित्याच्या स्थलांतरणाची प्रक्रिया गुरुवारपासून सुरु झाली. या पूर्ण प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात येत आहे.

या वसतिगृहांमधील विद्यार्थी हे लॉकडाऊनपूर्वीच आपापल्या घरी गेले आहेत. मात्र, त्यांचे कपडे, अंथरुण, शैक्षणिक साहित्य वसतिगृहामध्ये आहे. या साहित्याच्या स्थलांतरणाची प्रक्रिया गुरुवारी सकाळी १० वाजता सुरु करण्यात आली. त्यासाठी निरीक्षण समिती,



**शिवाजी विद्यापीठात गुरुवारी मुलांच्या वसतिगृहातील साहित्य स्थलांतरित करण्याची प्रक्रिया सुरु झाली. या प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जात आहे.**

कर्मचारी, जिल्हा प्रशासनाचे काही अधिकारी यांसह ४० हून अधिकजणांचे पथक कार्यरत आहे. प्रत्येक खोलीचे कुलूप काढण्यापासून ते त्या ठिकाणी असलेले साहित्य स्थलांतरित करण्याच्या प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जात आहे. संगणक, लॅपटॉपसारख्या वस्तू

> “साहित्य स्थलांतरित करण्याची प्रक्रिया जिल्हा आणि विद्यापीठ प्रशासनाच्या मार्गदर्शनानुसार सुरु आहे. वसतिगृहातील प्रत्येक विंगमधील दोन खोल्यांमध्ये साहित्य ठेवण्यात येत आहे. स्थलांतरित साहित्याबाबत नंतर कोणतीही तक्रार येऊ नये यासाठी या प्रक्रियेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जात आहे.
>
> - डॉ. एस. डी. डेळेकर, मुख्य अधीक्षक, मुलांचे वसतिगृह

| आकडेवारी दृष्टिक्षेपात | 03 | 315 | 650 |
|---|---|---|---|
| | वसतिगृहांची संख्या | एकूण खोल्यांची संख्या | निवासाची क्षमता |

बह्यांकरिता बॅगचा वापर केला जात आहे. वसतिगृह क्रमांक एकमधील

स्थलांतरित करण्यात आले. पुढील तीन दिवस ही प्रक्रिया चालणार

पुढारी

# ‘एनएसएस’ विद्यार्थ्यांचे संकटावेळी मोठे योगदान

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



मानवनिर्मित अगर नैसर्गिक संकटाच्या काळात शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पुढाकार घेऊन त्यावर मात करण्यासाठी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून काम करत आहे. गेल्या वर्षी महापूर व सध्या कोरोनाची साथ अशा परिस्थितीत एनएसएसचे विद्यार्थी मोठे योगदान देत आहेत, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना कक्ष व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी कोरोनासंदर्भात घ्यावयाच्या दक्षतेबाबत युट्यूबच्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रमात डॉ. शिंदे बोलत होते.

ते म्हणाले, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) स्वयंसेवक व स्वयंसेविका कोरोनाविरुद्धच्या लढाईत सहभागी आहेत. एनएसएसचे २८ हजार स्वयंसेवक फेसबुक, व्हाट्सॲपसह इतर माध्यमांचा वापर करत ५० लाखांहून अधिक लोकांपर्यंत पोहोचले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर म्हणाले, राज्यपालांनी केलेल्या आवाहनानुसार सर्वच विद्यापीठांमधील एनएसएस कक्ष गतिमानतेने या परिस्थितीत योगदान देत आहे.

एनएसएसच्या महाराष्ट्र व गोवा विभागाचे प्रादेशिक संचालक डी. कार्थिजेन, डॉ. अतुल साळुंखे, युनिसेफच्या अधिकारी डॉ. अपर्णा देशपांडे, डॉ. ज्योती पोटारे, डॉ. जी. के. पांडगे, डॉ. राजलक्ष्मी नायर, डॉ. स्वाती मोहपात्रा यांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रभाकर देसाई यांनी प्रास्ताविक केले.

# एनएसएसला योगदानाची संधी

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



**डॉ. नितीन करमळकर यांचे प्रतिपादन**

'करोना साथीचे स्वरुप आणि त्या कामी राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान या संदर्भात आपल्याकडे मोठ्या प्रमाणात मंथन व कार्यही सुरू आहे. करोना साथीच्या काळात थेट रस्त्यावर न उतरतासुद्धा राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसह सर्वसामान्य विद्यार्थ्यांना सुद्धा खूप मोठ्या प्रमाणावर सामाजिक योगदान देता येऊ शकते', असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरूवारी दुपारी ३ ते ५ या कालावधीत करोनासंदर्भात घ्यावयाच्या दक्षतेबाबत युट्यूबच्या माध्यमातून ऑनलाईन प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी बीजभाषण करताना कुलगुरू डॉ. करमळकर बोलत होते.

कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, 'पुणे येथे एनएसएसचे स्वयंसेवक विद्यार्थी चार प्रकारे आपले योगदान देत आहेत. त्यामध्ये गुगल ॲप तयार करून त्या माध्यमातून रक्तदाते व रक्तगट यांची यादी तयार करण्याचे मोठे काम करण्यात आले आहे. त्याखेरीज विद्यार्थी आपापल्या घराच्या परिसरातील साधारण दहा कुटुंबांना भाजीपाला, किराणा आणून देणे, बँकेतून पैसे काढून आणून देणे इत्यादी स्वरुपाची कामे आरोग्यविषयक दक्षता घेऊन करता येऊ शकतात. पोलिस कर्मचारी, आरोग्य क्षेत्रातील डॉक्टर, सेवक, परिचारक या वॉरियर्सना या सॅनिटायझरचा पुरवठा करण्यात येणार आहे. मास्क निर्मिती ही सुद्धा आजच्या काळाची गरज आहे. विद्यार्थी घरबसल्या मास्क तयार करून परिसरातल्या नागरिकांसह वॉरियर्सना त्याचा पुरवठा करू शकतात.' या प्रशिक्षण सत्राचा समारोप शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाने झाला.

या प्रशिक्षण सत्रात एनएसएसच्या महाराष्ट्र व गोवा विभागाचे प्रादेशिक संचालक डी. कार्थिगेन, राज्य समन्वयक डॉ. अतुल साळुंखे, युनिसेफच्या अधिकारी डॉ.अपर्णा देशपांडे, डॉ. ज्योती पोटारे, डॉ. जी.के. पांडगे, डॉ. राजलक्ष्मी नायर आणि डॉ. स्वाती मोहपात्रा यांनी मार्गदर्शन केले. डॉ. प्रभाकर देसाई यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. या ऑनलाइन प्रशिक्षणात एनएसएसचे राज्यभरातील समन्वयक, स्वयंसेवक, संलग्नित महाविद्यालयांतील आजी-माजी स्वयंसेवक- स्वयंसेविका आजी-माजी विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांच्यासह सर्वसामान्य नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले.



## एनएसएसचे सुमारे २८,००० स्वयंसेवक

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, 'सध्याच्या परिस्थितीत विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक पूर्ण तयारीनिशी उतरले असून प्रत्यक्ष तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून जनजागृतीचे कार्य प्रभावीपणे करत आहेत. एन.एस.एस.चे सुमारे २८,००० स्वयंसेवक फेसबुक, व्हॉट्सअप यांसह इतर सोशल मीडियाचा वापर करत ५० लाखांहून अधिक लोकांना प्रबोधित करून प्रशासनाच्या माध्यमातून त्यांना तत्परतेने मदत करत आहेत. गरजू, फिरस्ते, गावोगावचे असहाय ज्येष्ठ नागरिक, अनाथ, दिव्यांग इत्यादी लोकांच्या मदतीला जात आहेत.'

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात कोरोना रुग्णालय

## अतिदक्षता विभागासाठी २९ लाख ४२ हजारांच्या निधीला मान्यता; लवकर काम सुरू



**अतिदक्षता विभागासाठी असा आहे निधी...**

- स्थापत्य कामे : ८ लाख ८२ हजार
- विद्युत कामे : १० लाख ७ हजार
- ऑक्सिजन पुरवठा : ६ लाख १५ हजार
- वातानुकूलित यंत्रणा : ४ लाख ३८ हजार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वसतिगृहात 'कोरोना' रुग्णालय स्थापन केले जाणार आहे. या रुग्णालयातील अतिदक्षता विभाग तातडीने सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी गुरुवारी २९ लाख ४२ हजार रुपयांच्या निधीला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. हे काम येत्या काही दिवसांत सुरु केले जाणार आहे.

जिल्ह्याला कोरोनाचा धोका कायम आहे. रुग्णसंख्या मर्यादित असली तरी भविष्यात त्यात वाढ होण्याची शक्यता आरोग्य विभागाकडून व्यक्त केली जात आहे. रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली तर उपचारावर मर्यादा येऊ नये याकरिता जिल्हा प्रशासनाने शिवाजी विद्यापीठाच्या वसतिगृहात रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे.

विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (डीओटी) वसतिगृहात हे कोरोना रुग्णालय उभारले जाणार आहे. या ठिकाणी सुसज्ज असा अतिदक्षता विभाग (आयसीयू) उभारण्यात येणार आहे. 'कोरोना'चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेतील ६ कोटी ७७ लाख ३६ हजाराचा निधी मंजूर केला आहे. या निधीतील २९ लाख ४२ हजार रुपयांचा निधी अतिदक्षता विभागासाठी खर्च केला जाणार आहे. अतिदक्षता विभागाची उभारणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केली जाणार आहे. या निधीतून आवश्यक साधनसामुग्री खरेदी करायची असल्यास ती तातडीने करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या आहेत. या निधीला प्रशासकीय मान्यता दिल्याने येत्या दोन-तीन दिवसांत हे काम सुरू होईल, असे सांगण्यात आले.






कोल्हापूर : कोरोनामुळे विद्यापीठाचे कामकाज बंद असल्याने वर्दळ थांबली आहे. त्यामुळे या परिसरातील मोर, लांडोर आदी पक्षी स्वच्छंदपणे विहार करीत आहेत. करकोचाची समाधी आणि त्याची पाण्यातील प्रतिमा हे निवांतपणाचे प्रतीक आहे. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा)

## प्रशिक्षणास प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय सेवा योजना कक्ष आणि युनिसेफच्या संयुक्त विद्यमाने करोनासंदर्भात घ्यावयाच्या दक्षतेबाबत युट्यूबच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या ऑनलाइन प्रशिक्षणास प्रतिसाद मिळाला. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. अभय जायभाये यांनी ही माहिती दिली. पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि एनएसएसचे राज्य समन्वयक डॉ. अतुल साळुंखे यांनी उद्घाटन सत्रात मार्गदर्शन केले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शन सत्राने प्रशिक्षणाचा समारोप झाला.

## शिंदे यांना अभिवादन

कोल्हापूर : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शिंदे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

# विद्यापीठ विद्यार्थी वसतिगृहातील साहित्य पॅकिंगला सुरुवात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी वसतिगृह क्र.१ च्या १०० खोल्यांमधील साहित्य पॅकिंगला सुरुवात झाली आहे. कोरोना व संशयित रुग्णांसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग (डीओटी) यासह विद्यार्थी वसतिगृह ताब्यात घेण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने कार्यवाही सुरू केली आहे. यापूर्वी 'डीओटी' वसतिगृहातील साहित्य पॅकिंगचे काम पूर्ण झाले आहे. या ठिकाणी काहीजणांना संस्थात्मक विलगीकरण कक्षात ठेवले आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

# विद्यापीठात कोरोना रुग्णालय उभारण्याच्या हालचाली गतिमान

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारीचे उपाय म्हणून प्रशासनाने शिवाजी विद्यापीठात १ हजार बेडचे कोरोना रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठातील ३ वसतीगृहांमध्ये हे रुग्णालय होणार आहे. गुरुवारी प्रशासनाने वसतीगृहातील विद्यार्थ्यांचे साहित्य स्थलांतरणास सुरुवात केली. साहित्य स्थलांतरणाची सर्व प्रक्रिया इन कॅमेरा केल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

**वसतीगृहातील साहित्य स्थलांतरणास प्रारंभ**

आपत्कालीन परिस्थितीत विद्यापीठाने १ हजार बेडचे कोरोना केअर सेंटर उभारण्यासाठी मदत करण्याची ग्वाही दिली होती.

तरुण भारत Fri, 24 April 2020
https://epaper.tarunbharat.co